महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५४३ दिनांक ०२ / ०८ / २०१६

विषय : खादीची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य देण्याबाबत.

संदर्भ :महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९८/१८ (र.व का.), दि.१४.०६.२०१६

........

केंद्र शासनामार्फत खादी व ग्राम उद्योगाचा विकास होण्यासाठी विविध उपाययोजनांच्या धर्तीवर सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९८/१८ (र.व का.), दि.१४.०६.२०१६ अन्वये खादी व ग्रामउद्योगाच्या विकासाच्या मिशनमध्ये हातभार लावण्याकरिता, खादी व ग्राम उद्योगामध्ये अधिकाधिक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी खादीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय/अशासकीय शैक्षणिक संस्था यामधील अधिकारी/कर्मचारी यांनी प्रत्येक आठवडयात एक दिवस खादीची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य देण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सोबत शासन परिपत्रक दि.१४.०६.२०१६ ची प्रत जोडण्यात येत आहे.

२. यास्तव शासन परिपत्रक दि.१४.०६.२०१६ च्या धर्तीवर सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, उपरोल्लेखित शासन परिपत्रकातील तरतुदींच्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक आठवड्यात एक दिवस खादीचे वस्त्रे परिधान करण्याकरिता प्राधान्य द्यावे. सदर तरतुदी वेतनगट ३ व ४ मधील ज्या कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड/गणवेष विहित करण्यात आलेला आहे अशा कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाहीत.

३. सबब, सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णय दि.१४.०६.२०१६ मधील सूचनांचे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरिल प्रमाणे.

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc

**खादीची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१६ / प्र. क्र. ९८/ १८ ( र. व का. )**
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ जून, २०१६

**परिपत्रक :**

खादी व ग्राम उद्योगाचा विकास होण्यासाठी केंद्र शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याच उपाययोजनांचा एक भाग म्हणून मा. केंद्रीय राज्यमंत्री, सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योग यांनी शासकीय कार्यालये, शासकीय / अशासकीय शैक्षणिक संस्था तसेच ज्या कार्यालयांमध्ये ड्रेस कोड आहे, अशा सर्व कार्यालयांमधील अधिकारी / कर्मचारी यांनी आठवड्यातील किमान एक दिवस खादीची वस्त्रे परिधान करावीत, असे आवाहन केले आहे.

२. खादी व ग्राम उद्योगाच्या विकासाच्या मिशनमध्ये हातभार लावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. देशातील खादी व ग्राम उद्योगामध्ये अधिकाधिक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी खादीचा जास्तीत जास्त वापर होणे आवश्यक आहे. याद्दष्टीने राज्यातील शासकीय /निमशासकीय कार्यालये, शासकीय / अशासकीय शैक्षणिक संस्था यामधील अधिकारी / कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी प्रत्येक आठवड्यात एक दिवस खादीची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य द्यावे. ज्या विभागांमध्ये अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी ड्रेस कोड लागू आहे, त्या विभागांनीसुद्धा पोशाखाचा किमान एक संच खादीमध्ये तयार करून घेण्यास विशेष प्रयत्न करावेत व सदर पोशाख प्रत्येक आठवड्यात एक दिवस प्राधान्याने परिधान करावा.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना त्यांचे नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणाव्यात.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१६०६१४१७१८३२२३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr Prem Singh Meena

Digitally signed by Dr Prem Singh Meena
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b7ea6c0963c6e2968faf5ee62acd8a913dd4de985b56a05084b7de776d9e00bb, cn=Dr Prem Singh Meena
Date: 2016.06.14 17:22:34 +05'30'

**( डॉ. पी. एस. मीना )**
**अपर मुख्य सचिव ( प्र. सु. र. व का. )**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,

३) मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७) मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११) प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२०) प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३) निवड नस्ती ( कार्यासन १८ ).